**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड**

**( नगरपालिका प्रशासन विभाग)**

**क्रं.2018/नपाप्र/लोहा निवडणूक/का-1/टे-7/सीआर-55**

## नगरपरिषद लोहा सार्वत्रिक निवडणूक-2018 सुधारित निवडणुक कार्यक्रम

**नामनिर्देशनपत्र वेबसाईटवर भरण्याचा दिनांक,नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा कालावधी व नामनिर्देशन पत्रांची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमदेवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक**

नांदेड जिल्हयातील लोहा नगरपरिषदेच्या अध्यक्ष व सदस्य पदाच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम आयोगाचे आदेश क्रं.रानिआ/नप-2018/प्र.क्र 17/का-06 दिनांक 01/11/2018 अन्वये देण्यात आलेला असून सदर कार्यक्रमानूसार नामनिर्देशनपत्र वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी दि. 12/11/2018 (सोमवार) सकाळी 11.00 ते 19/11/2018(सोमवार) दुपारी 2.00 पर्यंत, नामनिर्देशिपत्र स्विकारण्याचा कालावधी दिनांक 12/11/2018(सोमवार) ते 19/11/2018 (सोमवार)(सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 पर्यंत) व नामनिर्देशनपत्रांची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक 20/11/2018(मंगळवार) सकाळी 11.00 वाजल्यापासून असा कालावधी निश्चित करण्यात आला होता. उपरोक्त नूसार निवडणुक कार्यक्रम जिल्हाधिकारी यांचेकडून दिनांक 05/11/2018 रोजीच्या प्रजावाणी व लोकमत या दैनिकात प्रसिध्द करण्यात आला आहे.

तथापि नामनिर्देशनपत्र व त्यासोबतचे शपथपत्र ऑनलाईन पध्दतीने भरतेवेळी काही तांत्रिक अडचणी उदभवल्यामुळे निवडणूक लढविणा-या उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व त्यासोबतचे शपथपत्र अदयाप संबधित निवडणूक निर्णय अधिका-यांकडे सादर करता आलेले नाहीत असे निवडणूक निर्णय अधिकारी व काही राजकीय पक्षांनी आयोगाला कळविले आहे.

उपरोक्तनूसार उदभवलेली परिस्थिती व भारतीय संविधान तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम, 1965 चे कलम 10-अ मधील तरतूदी ध्यानी घेता मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रं. क्रं.रानिआ/नप-2018/प्र.क्र 17/का-06 दिनांक 19/11/2018 अन्वये लोहा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी खालीलप्रमाणे सुधारीत निवडणूक कार्यक्रम देण्यात आला आहे.

**सुधारीत निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र | निवणूकीचा टप्पा | दिनांक 01/11/2018 च्या कार्यक्रमानूसार(जुना) दिनांक | सुधारीत कार्यक्रमानूसार टप्पा सुरू करण्याची/पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| 1 | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी | दि.12/11/2018(सोमवार) सकाळी 11.00 ते दि.19.11/2018 (सोमवार) दुपारी 2.00 पर्यंत | दिनांक 12/11/2018(सोमवार) सकाळी 11.00 ते दि.20/11/2018(मंगळवार) सायंकाळी 4.00 पर्यंत |
| 2 | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि. 12/11/2018(सोमवार) ते दि. 19/11/2018 (सोमवार) सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 पर्यंत | दिनांक 12/11/2018(सोमवार) ते दि.20/11/2018(मंगळवार) सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 पर्यंत |
| 3 | नामनिर्देशनपत्रांची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. 20/11/2018 (मंगळवार) सकाळी 11.00 वाजल्यापासून | दिनांक 21/11/2018(बुधवार) सकाळी 11.00 वाजल्यापासून |

तसेच मूळ कार्यक्रमातील (दिनांक 01/11/2018 चा निवडणूक कार्यक्रम) अ.क्र.5 नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक ते अ.क्र.9 महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल जाहीर करण्याचा दिनांक यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तसेच अपरिहार्य परिस्थितीत संबंधित नगरपरिषदेमध्ये नामनिर्देशनपत्र व त्यासोबतचे शपथपत्र वेबसाईटवर भरून त्याची प्रींट घेवून सादर करणे शक्य नसल्यास ते ऑनलाईन पध्दत व पारंपारिक या दोन्ही पैकी कोणत्याही पध्दतीने स्विकारण्यास सुधारीत कार्यक्रमानूसार मा. राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेली आहे.

सदर सुधारीत कार्यक्रमाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**स्थळः** नांदेड

**दिनांकः** 19/11/2018

(लहुराज माळी)
प्रभारी जिल्हाधिकारी नांदेड

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| वेबसाईटः www.nanded.gov.in | ई -मेल-dmonanded1@gmail.com |
| दूरध्वनीः (02462)235077 | फॅक्स क्र .(02462)238500 |
| शाखाः नगरपालिका प्रशासन विभाग | क्रं.2018/नपाप्र/लोहा निवडणूक/का-1/टे-7/सीआर- |

दिनांक 19/11/2018

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी,

नगरपरिषद लोहा सा.निवडणूक -2018

विषयः नगरपरिषद लोहा सार्वत्रिक निवडणूक-2018

सुधारीत निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भः 1.मा.राज्य निवडणूक आयोग यांचे आदेश क्र.रानिआ/नप-2018/प्र.क्र17/का-6 दिनांक 01/11/2018.

2. मा.राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्र.रानिआ/नप-2018/प्र.क्र17/का-6 दिनांक 19/11/2018.

3.या कार्यालयाचे प्रसिध्दी मसुदा क्रं.2018/नपाप्र/लोहा निवडणूक/का-1/टे-7/सीआर-55

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नगरपरिषद लोहा येथील सार्वत्रिक निवडणूक-2018 च्या अनुषंगाने संदर्भ क्र.1 नुसार निवडणुक कार्यक्रम मा.राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार देण्यात आला होता परंतु संदर्भ क्र.2 च्या मा.राज्य निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार सदर निवडणुकीसाठी सुधारित कार्यक्रम देण्यात आलेला आहे.

त्यानूसार सदर सुधारित निवडणूक कार्यक्रम लोहा नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डावर, तहसिल कार्यालयात, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात, पंचायत समितीच्या कार्यालयात तसेच शहराच्या प्रभागातील प्रमुख ठिकाणी दिनांक 19/11/2018 रोजी डकवून प्रसिध्द करण्यात यावा. सदर कार्यक्रम स्थानिक स्तरावर प्रसिध्दी केल्याबाबत गोषवारा व पंचनाम्याच्या प्रतिसह अहवाल या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावा.

सोबतः सुधारित निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करावयाचा मसूदा.

जिल्हाधिकारी नांदेड

प्रतिलिपी माहितीस्तव सादर

1. मा. उपसचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई
2. मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव

1. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.1, नगरपरिषद लोहा सार्वत्रिक निवडणूक-2018 तथा तहसिलदार लोहा.
2. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी क्रं. 2, नगरपरिषद लोहा सार्वत्रिक निवडणूक-2018 तथा मुख्याधिकारी नगर परिषद लोहा.
3. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, जि.अ.का नांदेड यांना देवून कळविण्यात येते सदर उपरोक्तनुसार निवडणूक कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर दिनांक 19/11/2018 रोजी प्रसिध्द करण्यात यावा.
4. जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय नांदेड यांना देऊन कळविण्यात येते कि, सदर सुधारित कार्यक्रमाबाबत आपले स्तरावरुन प्रेसनोट स्वरुपात स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

जिल्हाधिकारी नांदेड

Scanned by CamScanner